# १. संजय गांधी निराधार अनुदान योजना

- सदरची योजना सर्व साधारणपणे समाजातील निराधार व्यक्ती म्हणजे ज्या व्यक्ती स्वताचा उदरनिर्वाह करु शकत नाही. उदा. अपंग, अनाथ, दुर्धर रोगग्रस्त, विधवा स्त्रिया, एचआयव्ही ग्रस्त, अत्याचारीत महिला, वेश्या व्यवसायातुन मुक्त केलेल्या महिला, ३५ वर्षावरील अविवाहीत महिला इत्यादींना लाभ देणेत येतो.

- या योजनेतर्गत लाभार्थ्यांची मुले २५ वर्षाची होईपर्यंत किंवा नोकरी मिळेपर्यंत ( शासकीय / निमशासकीय / खाजगी ) या मध्ये जे अगोदर घडेल तोपर्यंत लाभार्थ्यांना लाभ देणेत येतो.

- लाभार्थ्यांना फक्त मुलीच असतील तर अशा लाभार्थ्यांच्या बाबतीत मुलींचे वय २५ वर्ष झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न होऊन त्या नांदावयास गेल्या, तरी सुध्दा लाभ चालु राहील.

# संजय गाधी निराधार अनुदान योजना

**पात्रतेचे निकष :-** १.कुटूंबाचे एकुण वार्षीक उत्पन्न २१०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

२. अपंगातील अस्थीव्यंग, अंध, मुकबधीर, कर्णबधीर, मतीमंद, इत्यादी प्रवर्गातील स्त्रि व पुरुष

३. क्षय रोग, पक्षघात, प्रमस्तीष्घात, कर्करोग, एड्स (एचआयव्ही), कूष्टरोग, सिकलसेल व सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दुर्धर आजारामुळे स्वताचा चरितार्थ चालवू न शकणारे स्त्रि व पुरुष

४.निराधार पुरुष / महिला / तृतीय पंथी, निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रीयेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणा-या किंवा या योजनेखालील विहीत केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळाणा-या महिला, देवदासी ,अत्याचारीत महिला व वेश्याव्यवसायातून मुक्त केलेल्या महिला

५.आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कूटूंबाचे वार्षीक उत्पन्न या योजनेखाली विहीत उत्पन्नापेक्षा कमी असल्यास ते कुटूंब

६.अनाथ मुले ( १८ वर्षाखालील )

**आर्थिक सहाय्य :-** या योजनेंतर्गत राज्य शासनाकडुन लाभार्थ्यांना रक्कम रुपये ६००/- प्रतिमहा
एकापेक्षा जास्त लाभार्थी निराधार कुटूंबाला रु. ९००/- दरमहा या मर्यादेत

**आवश्यक कागदपत्रे :-** १. वयाचा दाखला ( ६५ वर्षापेक्षा कमी वय )
२.उत्पन्न दाखला ( प्रतीवर्ष र. रु. २१०००/- पर्यंत )
३. अपंगत्वाचे प्रमाणपत्र
४.अनाथ असल्याचा दाखला